# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

**क्रमांकः सीडीआर-१०११/प्र.क्र.१४४/पुनर्बांधणी ७/ ११**

मादाम कामा रोड, मंत्रालय,

हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

तारीख: ०७ मे ,२०१३

**भारताचे संविधान**

क्रमांक- सीडीआर-१०११/प्र.क्र.१४४/पुनर्बांधणी ७/११ - भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत:-

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) (सुधारणा) नियम, २०१३ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम १९ मध्ये,

**(अ)** पोट नियम (१), टीप- २ मध्ये, **रु.(१०,०००) हून कमी** या शब्द, अक्षर व अंकाच्या ऐवजी **"शासकीय कर्मचाऱ्याच्या दोन महिन्यांच्या मूळ वेतनाहून कमी"** या शब्दांचा समावेश करण्यात यावा;

**(ब)** पोट नियम (३) च्या जागी पुढील पोट नियम दाखल करण्यात यावा:-

**"(३) प्रत्येक शासकीय कर्मचारी त्याने स्वत:च्या नावाने किंवा त्याच्या कोणत्याही कुटुंबियांच्या नावाने केलेला ज्याची किंमत त्याच्या दोन महिन्यांच्या मूळ वेतनापेक्षा अधिक असेल असा जंगम मालमत्तेचा प्रत्येक व्यवहार विहित प्राधिकरणास कळवील.**

**परंतु, जर असा कोणताही व्यवहार-**

**(एक)** **शासकीय कर्मचाऱ्याशी कार्यालयीन व्यवहार करणाऱ्या व्यक्तीबरोबर, किंवा**

**(दोन)** **नेहमीच्या किंवा प्रसिद्ध व्यापाऱ्यामार्फत केला असेल त्याहून अन्य प्रकारे केला असेल तर शासकीय कर्मचाऱ्याला विहित प्राधिकरणाची पूर्वमंजुरी मिळवावी लागेल.**"

(क) पोट नियम (५) खालील स्पष्टीकरणामधील खंड (१) खालील उप खंड (अ) मध्ये, **"ज्यांचा वार्षिक हप्ता रु.*(१०,०००) हून अधिक आहे अशा विमापत्रांची रक्कम किंवा शासनाकडून मिळालेल्या एकूण वार्षिक विमालब्धीच्या एक-षष्ठांश रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम" या शब्द, अक्षरे आणि अंकाऐवजी "ज्यांचा वार्षिक हप्ता शासकीय कर्मचाऱ्याच्या दोन महिन्यांच्या मूळ वेतनापेक्षा अधिक आहे अशी विमापत्रे"** हे शब्द दाखल करण्यात यावेत.

सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा संकेताक २०१३०५०७१२१०५२४४०७ असा आहे. ही अधिसूचना डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JADHAV PANDURANG J

Digitally signed by JADHAV PANDURANG J
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=JADHAV PANDURANG J
Date: 2013.05.07 15:09:35 +05'30'

**(पां.जो.जाधव)**

**शासनाचे उप सचिव**

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव,

२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

३. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,

४. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,

५. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,

६. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ स्वीय सहायक,

७. * प्रबंधक, उच्च न्यायलय (मूळ शाखा), मुंबई

८. * प्रबंधक, उच्च न्यायलय (अपील शाखा), मुंबई

९. * प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई

१०. * सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,

११. * सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,

१२. * सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

१३. * आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,

१४. सर्व मंत्रालयीन विभाग,

१५. सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख,

१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),

१७. विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती),

१८. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,

१९. निवडनस्ती

२०. * पत्राने